## सन 2025-26 या वर्षात शासकीय, निमशासकीय व इतर योजने अंतर्गत लागणाऱ्या पैदासक्षम शेळया / मेंढ्या/ बोकड/ मेंढेनर विक्री झाली तर खरेदी या तत्वावर पुरवठा करण्यासाठी अर्ज मागविण्यासाठी नियम व अटी

1. सन २०२५-२६ या वर्षासाठी (३० सप्टेंबर २०२६ पर्यंत) खरेदीचे दर पुढील प्रमाणे आहेत.

| अ क्र | वरीलप्रमाणे पुरवठा करावयाच्या शेळया / बोकड व मेंढ्या / मेंढेनर यांचा तपशिल | महामंडळाच्या प्रक्षेत्र/ तालुका/ जिल्हा मुख्यालय पोहच, दर प्रति किलो जिवंत वजनावर सर्व खर्चासह आणि करासह | प्रक्षेत्रावर खरेदी केलेल्या शेळया-मेंढ्यांना लसीकरण जंतप्रतीबंधक औषधे देणे, असे निगराणीसाठी १० दिवसांसाठी ठेवण्याकरिता संगोपनाच्या खर्चाकरिता प्रति किलो अतिरिक्त दर |
|---|---|---|---|
| १ | १ ते ३ वर्ष वयाच्या (२ ते ६ दाती) कोणतेही व्यंग नसलेले, सदृढ, निरोगी, सशक्त, जातीवंत पैदासक्षम शेळया | रु. ३४२ /- (अक्षरी रु. तीनशे बेचाळीस फक्त) | रु. ३५२/-(अक्षरी रु. तीनशे बावन्न फक्त) |
| २ | १ ते ३ वर्ष वयाचे (२ ते ६ दाती) कोणतेही व्यंग नसलेले, सदृढ, निरोगी, सशक्त, जातीवंत पैदासक्षम मेंढ्या | रु. ३४२ /- (अक्षरी रु. तीनशे बेचाळीस फक्त) | रु. ३५२/- (अक्षरी रु. तीनशे बावन्न फक्त) |
| ३ | १ ते ३ वर्ष वयाचे (२ ते ६ दाती) कोणतेही व्यंग नसलेले, सदृढ, निरोगी, सशक्त, जातीवंत पैदासक्षम बोकड | रु. ३७६/- (अक्षरी रु. तीनशे शहात्तर फक्त) | रु. ३८६/- (अक्षरी रु. तीनशे शहाऐंशी फक्त) |
| ४ | १ ते ३ वर्ष वयाच्या (२ ते ६ दाती) कोणतेही व्यंग नसलेले, सदृढ, निरोगी, सशक्त, जातीवंत पैदासक्षम मेंढेनर | रु. ३७६/- (अक्षरी रु. तीनशे शहात्तर फक्त) | रु. ३८६/- (अक्षरी रु. तीनशे शहाऐंशी फक्त) |

अ) महामंडळास शेळया-मेंढ्या व्यापारी पुरवठेदाराची नेमणुक करताना खालील बाबींची/ कागदपत्रांची पूर्तता करूनच करारनामा करण्यांत यावा.

१ सन २०२२ -२३, सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ या कालावधीचे आयकर विवरण पत्र जोडणे आवश्यक आहे.

२ कृषी उत्पन्न बाजार समितीचे खरेदी विक्रीचे अधिकृत परवाना प्रमाणपत्र सादर करावेत.

३ व्यापारी पुरवठेदाराकडून शेळया / मेंढ्या खरेदी करण्यासाठी व्यापारी पुरवठेदारांनी रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर महामंडळाशी करार करणे व प्रतीजिल्हा रु.५ लाख इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून ठेवणे आवश्यक राहिल

४ अर्जदाराचे Pan Card जोडणे आवश्यक आहे.

५ पुरवठेदाराच्या बिलावर (Tax Invoice) संस्थेचा नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे

क) महामंडळास शेळया / मेंढ्या पुरवठा करण्यामाठी तयार असलेल्या महिला बचत गट, शेतकरी, शेळी / मेंढी पालकांचे नोंदणीकृत गट व इतर यांच्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करून घेण्यात यावी.

१ महिला आर्थिक विकास महामंडळ(माविम), महाराष्ट्र जीवन्नोती अभियान (MSRLM) अंतर्गत नोंदणीकृत महिला गट असल्यास त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे नोंदणी प्रमाणपत्र.

२ (FPO)शेतकरी उत्पादक संघटना व राज्यातील शेळी/ मेंढी पालकांचे नोंदणीकृत गट यांचे नोंदणी प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे .

३ (NLM) नशनल लाईव्हस्टोक मिशन अंतर्गत शेळीपालन प्रकल्प पूर्णत्वाचे प्रमाणपत्र संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे असणे अनिवार्य आहे.

४ शेळया-मेंढयांच्या सहकारी संस्था / ट्रस्ट असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५ महिला बचत गट, (FPO)शेतकरी, व राज्यातील शेळी/ मेंढी पालकांचे नोंदणीकृत गट व शेळया-मेंढयांच्या सहकारी संस्था यांना सुरक्षा अनामत रक्कम रु.५.०० लाख भरणा करणे पासून सूट देऊन मात्र रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर महामंडळाशी करारनामा करणे आवश्यक राहील. (महामंडळाच्या सर्व प्रक्षेत्रापैकी फक्त एका प्रक्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील एकाच जिल्ह्यासाठी रक्कम रु. ५.०० लाख सुरक्षा अनामत रक्कमेची सुट राहील.)

६ अर्जदाराचे Pan Card जोडणे आवश्यक आहे

ख) शेळया मेंढ्या पुरवठा करण्यासाठी महामंडळाची प्रक्षेत्रे व कार्यक्षेत्रातील जिल्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र | महामंडळाचे प्रक्षेत्र | प्रक्षेत्र अंतर्गत येणारे जिल्हे |
|---|---|---|
| १ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र अंबेजोगाई जि. बीड | बीड/ लातुर/ परभणी |
| २ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र बिलाखेड ता.चाळीसगांव,जि. जळगांव | जळगांव/ नाशिक/ धुळे/ नंदुरबार |
| ३ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र दहिवडी ता. माण, जि. सातारा | सातारा/ रायगड/ ठाणे/ पुणे/ पालघर |
| ४ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पडेगांव जि.छ.संभाजीनगर | जालना/ बुलढाणा/ अहिल्यानगर/ छ.संभाजीनगर |
| ५ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पोहरा जि.अमरावती | अमरावती/ वर्धा/ अकोला/ वाशिम/ यवतमाळ |
| ६ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र महुद, ता. सांगोला, जि. सोलापूर | सोलापूर |
| ७ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र मुखेड जि. नांदेड | नांदेड/ हिंगोली |
| ८ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्ररांजणी,ता.कवठेमहांकाळ, जि. सांगली | सांगली/ कोल्हापूर/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग |
| ९ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र तिर्थ ता. तुळजापूर जि. धाराशिव | धाराशिव |
| १० | पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र बोंद्री, ता.रामटेक, जि.नागपूर | भंडारा/ नागपूर/ गडचिरोली/ गोंदिया/ चंद्रपुर |

# सन २०२५-२०२६ या पुरवठा वर्षाकरिता व्यापारी कार्यक्रमांतर्गत व इतर योजनेंतर्गत शेळया-मेंढ्यांचा पुरवठा करण्यासाठी करावयाचा अर्ज

---

प्रति

प्रक्षेत्र व्यवस्थापक,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र.......ता. ........जि...........

विषयः- सन २०२५-२०२६ या पुरवठा वर्षाकरिता व्यापारी कार्यक्रम व इतर शासकीय योजनेअंतर्गत शेळया- मेंढ्यांचा पुरवठा करणेबाबत...

संदर्भ: दिनांक . / /२०२५ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली जाहिरात

महोदय,

वरील विषय व संदर्भिय विषयास अनुसरून मी श्री./सौ.---------------------------------------------

रा............... ता................ जि................ अर्ज सादर करतो की, सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता व्यापारी कार्यक्रम व इतर शासकीय योजनेअंतर्गत आपल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र ता. जि. या अंतर्गत / जिल्ह्यासाठी सन २०२५-२०२६ या पुरवठा वर्षाकरिता महामंडळाने निश्चित केलेल्या शेळ्या-मेंढ्यांच्या खरेदी दरानुसार शेळया मेंढ्यांचा पुरवठा करण्यास तयार आहे.

शेळया मेंढ्यांचा पुरवठा बाबतच्या सर्व नियम अटी मला मान्य असून मी दिनांक / /२०२५ रोजी सुरक्षा ठेव रक्कम रु. /- (अक्षरी रु. ) भरणा करीत आहे. तसेच जाहिरातीमधील सर्व बाबींची पूर्तता करीत असून मला शेळया मेंढ्यांचा पुरवठा करण्याची संधी मिळावी ही विनंती.

सही

सोबतः

पुरवठेदाराचे संपूर्ण नाव व पत्ता